<u>भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र</u>

(दुपार)

जा.क्र.६१८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०९/२०१७

**१) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २९/०८/२०१७ चे ११.३० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हिला काणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. कोयंडे पो.स्टे करडी हे करीत आहेत.

**२) रात्रीचे अधांरात अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०१/०९/२०१७ चे ०१.४५ ते ०२.१५ वा. दर. यातील आरोपी हे अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखल पात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने संशयीत रित्या घरफोडी करण्याचे साधनासह मिळुन आल्याने व कोणतेही समाधान कारक उत्तर न देता उडवा उडवीचे उत्तर दिल्याने, आरोपी क्र.३ चे ताब्यातुन १ पांढऱ्या रंगाची वेगो मोटार सायकल, कि. २०,०००/रु , १ लोंखडी रॉड, कि. १०/रु असा एकुन २०,०१०/रु चा माल मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोशि. रायपुरकर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे १२२ ई मपोका.सहकलम १३०(१)/१७७,१३९/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राठोड पो.स्टे भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) विहीरीचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु. :–**

दिनांक २७/०८/२०१७ चे ०७.३० वा. दर यातील फिर्यादीचा पती मृतक गजानन सुखदेव शहारे वय ३५ वर्ष रा. लालालजपतराय भंडारा हा दारू पिण्याच्या सवयीचा असुन दि.२७/८/२०१७ रोजी घर काहीन सांगता घरून निघुन गेला याने दारूचे नशेत सार्वजनिक विहीरीत उडी मारून विहीरीचे पाण्यात बुडुन मरण पावाल्याने फिर्यादी श्रीमती शारदा गजानन शहारे वय ३१ वर्ष रा. लालालजपतराय वार्ड भंडारा हिचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी थेरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) वैनगंगा नदीचे पात्रात मुलाचे प्रेत मिळुन आल्याने मर्ग नोंद:–**

दिनांक ३०/०८/२०१७ चे ०९.३० वा. दर यातील यातिल मृतक पियुष मिलींद बडवाईक वय १६ वर्ष रा. खातरोड भंडारा हा दि.३०/८/२०१७ ला सकाळी मित्रासोबत भंडारा वैनगंगा नदीघाटात पोहण्यास गेला व पाण्यात पोहत असतांना, पाण्याचे ओढीमुळे पाण्यात बुडुन वाहत जावुन तिड्डी वैनंगगाचे पाण्यात मृतकचे प्रेत मृत अवस्थेत मिळुन आल्याने, फिर्यादी मिलींद बाबुराव वासनिक वय ५० वर्ष रा. कारधा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**५) थिमेट प्राशन करून औषोधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :–**

दिनांक ०१/०९/२०१७ चे ०५.४५ वा. दर यातील मृतक अनिल मनीराम वय ४५ वर्ष रा. चिखला टोली याने थिमेट प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करिता त्यास दि. २७/८/२०१७ ला सा.रू.भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र.००/१७ कलम १७४ जा.फौ. चे प्राप्त कागदपत्र वरून सरतर्फे फिर्यादी पोना. वक्केकार यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ३१/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली आहे त्यापैकी अवैध प्रवासी ०२ तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०१ केसेस करण्यात आलेल्या आहे.

02.9.

(एस. व्ही. कुलकर्णी )
**पोलीस उपअधिक्षक (गृह) भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.